# बैठकीचे इतिवृत्त (Minutes of Meeting)

Tender No १९६५

कंत्राटी कर्मचारी सेवा बाह्यस्त्रोतामार्फत् सुरक्षानिरिक्षक- २, स्वच्छता निरिक्षक-५, दुरध्वनी चालक-४, कनिष्ठ लिपिक-१०, शिंपी-२, वाहनचालक-४ (एकूण २७ पदे पुरविण्याबाबत)

सदर ई-निविदेच्या अनुषंगाने दिनांक १२/०३/२०१८ रोजी निविदा पूर्वक बैठक घेण्यात आली. त्याबैठकीत निविदाधारक / कंत्राटदाराने खालील प्रमाणे प्रश्न उपस्थित केलेत, त्याअनुषंगाने समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

**१) निविदेची किंमत/ रक्कम कमी करण्यात यावी :-**

सदर निविदेची रक्कम हे महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/उद्योग-४ दिनांक ३०/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये ठरविण्यात आलेली असल्याने सदर निविदेची किंमत / रक्कम कमी करता येणे शक्य नाही असे समितीने ठरविले.

**२) प्रत्येक मनुष्य पुरवठाधारकाचे वेगवेगळी निविदा काढण्यात यावी :-**

महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निग्रय क्रमांक पदनि २४१६/ प्र.क्र. २०३/१६/वैसेवा-१ दिनांक ०९/०२/२०१६ अन्वये शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय चंद्रपूर करीता बाह्यस्त्रोताने भरण्याकरीता वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे मंजूर आहे. त्यामुळे एकुण वर्ग-३ च्या पदाची निविदा काढण्यात आलेली आहे. प्रत्येक मनुष्यपूरवठाधारकाचे वेग-वेगळी निविदा काढणे शक्य नाही असे समितीने ठरविले.

**३) निविदेतील बँक सॉलव्हन्सी कमी करण्यात यावी.**

सदर निविदेतील बँक सॉलव्हन्सी कमी करण्याचा निर्णय समितीने मान्य केलेला असून ती ५० लक्ष ऐवजी रुपये १० लक्ष करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे लहान-मोठे सर्वच कंत्राटदार / निविदाधारकाला सदर निविदेमध्ये भाग घेणे शक्य होईल.

**४) प्रपत्र ४ मध्ये सुधारणा करण्यात यावी.**

काही कंटारदारानी प्रपत्र ४ मध्ये (Price Bid) मध्ये त्रृटी असल्याचे निदर्शनास आणून दिल्याने प्रपत्र -४ मध्ये सुधारणा करण्यात आलेली असून, प्रस्तूत सुधारणा शुध्दीपत्रकात नमुद करण्याचे समितीने ठरविले आहे.

**५) मुदत वाढ :-**

सदर निविदेमध्ये अंशत: बदल करण्यात आलेला असल्याने सदर निविदेला १५ (पंधरा) दिवसांची मुदत वाढ देण्यास समितीने मान्य केलेली आहे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
चंद्रपूर